

"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार"

-शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे,

(स्वायत्त) कोल्हापूर

# विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)

## इतिहास विभाग

**********************************************************

**सूचना** दि. 20 / 10 / 2020

विवेकानंद कॉलेजच्या इतिहास विभागातील बी. ए. भाग - I च्या सर्व विद्यार्थी विद्यार्थिनींना सुचित करण्यात येते की, शुक्रवार दिनांक 23/10/2020 रोजी इतिहास पेपर क्रमांक.- I "प्राचीन भारताचा इतिहास" या विषयाच्या प्रकरण-1 (प्राचीन भारताच्या इतिहासाची साधने ) वरील युनिट टेस्ट चे आयोजन पहिल्या तासाला रूम नंबर 13 मध्ये सकाळी 7.30 ते 8.15 या वेळेत केले आहे. तरी सर्व विद्यार्थ्यांनी तयारीनिशी टेस्टला वेळेवर उपस्थित राहावे.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

डॉ. एस. आर. कट्टीमनी

इतिहास विभाग

(37)



"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार"

-शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे,

(स्वायत्त) कोल्हापूर

# विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)

## इतिहास विभाग

******************************************************

**प्रश्नपत्रिका** दि. 23 / 10 / 2020

बी. ए. भाग - I

सेमिस्टर - I

पेपर क्रमांक - I

विषय - "प्राचीन भारताचा इतिहास"

प्रकरण-1 प्राचीन भारताच्या इतिहासाची साधने

युनिट टेस्ट

वेळ - सकाळी 7.30 ते 8:15

प्रश्न - प्राचीन भारताच्या इतिहासाची अलिखित / पुरातत्वीय साधने स्पष्ट करा . (गुण-10)



"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार"

-शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे,

(स्वायत्त) कोल्हापूर

# विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)

## इतिहास विभाग

**गुणपत्रक / मार्कलिस्ट** दि. 23/10/2020

---

वर्ग - बी.ए.- I सेमिस्टर - I

पेपर क्र - I टेस्ट - युनिट टेस्ट

प्रकरणाचे नाव - प्राचीन भारताचा इतिहास एकूण गुण - 10

| अ.क्र. | रोल नंबर | मिळालेले मार्क्स | अ.क्र. | रोल नंबर | मिळालेले मार्क्स |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 4642 | 9 | 10 | | |
| 2 | 4740 | 10 | 11 | | |
| 3 | 4788 | 7 | 12 | | |
| 4 | 4607 | 9 | 13 | | |
| 5 | 4665 | 10 | 14 | | |
| 6 | | | 15 | | |
| 7 | | | 16 | | |
| 8 | | | 17 | | |
| 9 | | | 18 | | |

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

विषय शिक्षक स्वाक्षरी

39

9/10

GoodLuck Page No.
Date 16 | 10 | 20

अंकिता दत्तात्रय कुरणे
B.A SEM I
विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर
विषय - इतिहास
हजेरी नं - 4642

प्र.१ प्राचीन भारताच्या इतिहासाची आलिखित किंवा पुरातत्वीय साधने स्पष्ट करा.

→ पुरातत्वीय साधने / भौतिक साधने -

आधुनिक काळात पुरातत्वशास्त्राला सामाजिक शास्त्राबरोबरच भौतिक शास्त्र म्हणून मानले जाते. भारताचा बहुतांशी इतिहास भौतिक साधनांवर अवलंबून आहे. वाङमयात काल्पनिकता व अतिशयोक्ती जास्त असल्याने भौतिक साधने जास्त ऐतिहासिक मानली जातात. भौतिक साधनांमुळे आपणास बराचसा इतिहास समजतो. वाङमयीन साधनांना भौतिक पुराव्यामुळे बळकटी प्राप्त झाली. भाषा व लिपीचा विकास झाल्यानंतर अनेक राजपुरुषांनी नाणी पाडली. या आलेख व नाण्यांमधून इतिहासाच्या पाऊलखुणा दिसतात. विसाव्या शतकात पुरातत्वीय उत्खनन शास्त्राच्या मदतीने असंख्य भौतिक पुरावे उजेडात आले. सिंधू संस्कृती, सातवाहन व वाकाटकांचा इतिहास याच प्रयत्नांमुळे उपलब्ध झाला.

~~वाङमयीन~~

आलिखित / पुरातत्वीय साधने -

या साधनांमध्ये शिलालेख, ताम्रपट, नाणी, मूर्ती, गुहालेख, लेणी, मंदीर, प्राचीन स्मारके व त्यांचे अवशेष व उत्खननात मिळालेल्या अवशेषांना

---

१) प्राचीन अवशेष व स्मारके - भूतकालीन इतिहास आपल्या ~~कतृ~~ कर्तृत्वाचे जे पुरावे मागे ठेवतो. त्यास प्राचीन अवशेष म्हणतात. भारतात स्थापत्य, शिल्प, चित्र व धातुकाम कलेमध्ये आश्चर्यकारक प्रगती आलेली होती. त्याचे अवशेष भारतात विखुरलेले आहेत. प्राचीन अवशेषांचे स्थूलमानाने दोन प्रकार पडतात. ज्या पुरातत्वीय वास्तू व वस्तू जमिनीवर असून सहजपणे उपलब्ध होतात त्यांना प्राचीन स्मारके म्हणतात. आणि जमिनीत गडप झालेल्या वास्तू उत्खनन करून मिळाल्या

भागतात त्यांना प्राचीन अवशेष असे म्हणतात. प्राचीन अवशेष व स्मारकांचे संरक्षण व संशोधन करण्यासाठी 'पुरावस्तू संशोधन खात्याची' स्थापना करण्यात आली, तेव्हापासून भारतभर अनेक ठिकाणी उत्खनने झाली. मोहेंजोदडो व हडप्पा च्या प्रदीर्घ उत्खननानंतर सिंधू संस्कृतीचा इतिहास प्रकाशात आला. तसेच लेण्या व स्थापत्य शिल्प संशोधनामुळेच प्रकट झाले. डॉ. कनिंगहम, व्हीलर, पीगाट, मार्शल, बॅनर्जी साहनी व इतरांच्या परिश्रमातून पाटलीपुत्र, नालंदा, तक्षशिला, कपिलवस्तू, नागार्जुनकोंडा व मोहेंजोदडो, हडप्पा चे अवशेष उत्खननातून मिळाले आहेत. सम्राट अशोकाच्या राजवाड्याचे अवशेष पाटलीपुत्र नगरीजवळ सापडले. सिंधू संस्कृतीचा पूर्ण इतिहास भौतिक पुराव्यांवर आधारित आहे. उत्खननामध्ये नगरे, खेडी, राजवाडे, मंदिरे, चैत्यगृहे, नाणी, मुद्रा, अस्थि, पेट्या, शृंगार, शस्त्रे, औषधे, खेळणी, कापड, मातीची भांडी व धान्याच्या अवशेषांमधून आपणास प्राचीन काळातल्या सामाजिक, आर्थिक, धार्मिक व सांस्कृतिक इतिहासाची माहिती मिळते.

२) स्मारके –

स्मारके हा प्राचीन अवशेषाचा एक प्रकार आहे. भारतीयांनी मौर्य काळापासून स्थापत्य व शिल्पकलेच्या क्षेत्रात नेत्रदीपक प्रगती केलेली आहे. त्याचा चांगला परिणाम म्हणून चैत्यगृह, स्तूप, विहार, लेण्या, मंदिरे, राजवाडे, नगरे, मूर्ती, स्तंभ, मातीची व धातूची कलात्मक भांडी अशा विविध स्वरूपात भारतीय कला भरभराटीस आली. भारतभर आज ती विविध स्मारकांच्या रूपाने अस्तित्वात आहे. या स्मारकामधून तत्कालीन धार्मिक व सामाजिक जीवनाबरोबरच स्थापत्य, शिल्प, मूर्ती, चित्रकला आणि धातूकाम शास्त्राच्या उन्नतीची कल्पना येते.

३) आलेख –

भौतिक साधनात आलेखांना अद्वितीय स्थान आहे. ज्या वेळी भारतात लिपी व भाषेचा विकास झाला तेव्हापासून अनेक राज्यकर्त्यांनी असंख्य आलेख कोरविले. एका अर्थाने आलेख म्हणजे लिखित भौतिक पुरावे आहेत. संस्कृत, पाली, मागधी, मोडी, कन्नड, तेलगू व इतर प्राकृत भाषेत हे आलेख लिहिले गेले. ब्राम्ही, [illegible]री, तमिळ, खरोष्टी ही त्यांची लिपी आहे. [illegible] [illegible]ण्या, धातू, मंदिरे,

GoodLuck Page No.
Date

भिंती, छत, कमानी व विविध इमारतीवर असंख्य आलेख कोरलेले पाहायला मिळतात. या माध्यमांमुळे स्तंभालेख, गुहालेख, धातूलेख व (प्रस्तरलेख) शिलालेख असे प्रकार निर्माण झाले. धर्मप्रसार करण्यासाठी व राजाज्ञा जनते-पर्यंत पोहचविण्यासाठी काही आलेख कोरविण्यात आले. प्राचीन काळातील राज्यविस्तार, व्यापारीवृध्दी, करव्यवस्था, शासनव्यवस्था, अर्थस्थिती, धर्मकल्पना, समाजजीवन इ. अनेक विषयांची माहिती आलेखांमधून मिळते.

4) शिलालेख-
प्रचंड आकाराचे खडक, गुहेच्या भिंती यावर लिहलेल्या आलेखांना शिलालेख म्हणतात. शिलालेख प्राचीन भारताच्या इतिहासाच्या अभ्यासाची महत्वाची साधने आहेत. मोठ्या-मोठ्या दगडी शिळांवर, खडकांवर आणि दगडी स्तंभांवर लेखन करण्याची पध्दती मौर्य सम्राट अशोकाच्या काळापासून सुरु झाली. अशोकाच्या शिलालेखात प्रामुख्याने राजाज्ञा व आदेश तसेच बौद्ध धर्माचे संदेश आढळतात. यानंतर या शिलालेखात राजांची गुणवर्णन, वंशावळी, सरदारांची व अधिकाऱ्यांची नामावली तसेच क्वचित प्रसंगी दानपत्र सुध्दा कोरलेले आढळतात. अशोकाच्या शिलालेखाची संस्कृत, खरोष्टी, प्राकृत, पाली भाषेतून ही शिलालेख कोरलेले दिसतात. प्रचंड आकाराचे खडक, गुहेच्या भिंती यांवर लिहलेल्या आलेखांना शिलालेख म्हणतात.

i) इ.स.पू. 1400 चा आशिया मायनरमधील बोगाजकोई शिलालेख आर्यांच्या मूळ स्थानावर प्रकाश टाकतो.

ii) अशोकाच्या 14 शिलालेख, 7 स्तंभालेख, दोन कलिंगालेख व इतर लेखांमधून मौर्य घराण्याचा इतिहास समजतो.

iii) शिलालेखांमधून चालुक्य सम्राट दुसरा पुलकेशी व हर्षवर्धन यांची माहिती उपलब्ध होते.

iv) ओरिसातील कलिंग राजा खारवेल चा हाथीगुंफा शिलालेख शुंग व खारवेल घरण्याची माहिती पुरवितो.

v) मेहरोली लोहस्तंभाद्वारे चंद्रगुप्त विक्रमादित्याचा इतिहास स्पष्ट होतो.

vi) नाणेघाटातील (जुन्नर) राणी नागनिकेचा आलेख व नाशिक लेण्या-तील आलेख सातवाहन घरण्याचा इतिहास कथन करतात.

vii) अशोकाच्या अलाहाबाद स्तंभावरील हरिषेण प्रशस्ती मधून समुद्रगुप्ताच्या दिग्विजयाची माहिती मिळते.

Date

## ड) ताम्रपट –

हा आलेखाचा एक प्रकार आहे. तांब्याच्या पत्र्यावर कोरलेल्या सनदांना ताम्रपट असे म्हणतात. प्राचीन काळी अनेक सम्राट, व्यक्ती व धर्मसंस्था दानधर्म करीत असत. दिलेल्या दानाची माहिती तांब्याच्या पत्र्यावर कोरून प्रशस्तीरूपाने (सनद) देण्याची पद्धत होती. अशा दानपत्रांनाच ताम्रपट म्हणतात. यामध्ये राजा आपला व पूर्वजांचे पराक्रम, वंशावळी, आत्मस्तुती, राज्यविस्तार, मालमत्तेचा तपशील, जमिनीचा आकार, घेणाऱ्याचे नाव इ. भरपूर नोंद करीत असे. हे ताम्रपट संस्कृत व प्राकृत भाषेत आहेत. कालगणना, राजकीय इतिहास व धार्मिक धोरणांची माहिती यातून मिळते. विंध्यशक्तीचा वाशिम ताम्रपट, प्रभावती गुप्तांचा पुणे ताम्रपट व दुसऱ्या प्रवरसेनेचा शिवनी ताम्रपट, वाकाटक घराण्याची ऐतिहासिक माहिती पुरवितात. स्कंदगुप्ताचा इंदोर ताम्रपट, हर्षाचा मधुबन ताम्रपट, कुमारगुप्ताचा दामोदर ताम्रपट आणि सातवाहन, राष्ट्रकूट व चालुक्य राजांच्या ताम्रपटामधून दक्षिणी राजघराण्याचा इतिहास प्राप्त होतो. शिलालेखाप्रमाणेच ताम्रपटांनाही ऐतिहासिक महत्त्व आहे. कनिंगहॅम, प्रिन्सेस व बर्जेस या संशोधकांनी ताम्रपटाच्या लिपीचा अभ्यास करून त्याचे वाचन केल्यामुळे बराचसा अज्ञात इतिहास प्रकाशात आला.

## ह) नाणी व मुद्रा –

मौर्य काळापासूनच इतिहास जाणून घेण्याचे उपयुक्त भौतिक साधन म्हणून नाण्यांचा उल्लेख करता येतो. आधुनिक काळात Neumismatics Society of India तर्फे भारतीय नाण्यांचा सखोल अभ्यास व संशोधन चालू असून तो इतिहासाचा पूरक आहे. प्राचीन काळातील अनेक राजघराण्यांनी हजारो नाणी सापडली आहेत. मुद्रा हा नाण्यांसारखाचा एक प्रकार आहे. परंतु त्याचा चलनाप्रमाणे वापर होत नव्हता. राजमुद्रा, व्यापारी मुद्रा, धार्मिक शिक्के, विविध संघटना व संस्थांच्या मुद्रा प्रचलित होत्या. मुद्रेवर प्रतिमा, मजकूर, पदव्या व बोधचिन्ह कोरलेले असे. त्या विविध धातूंच्या होत्या.

मौर्य, गुप्त, सातवाहन, वाकाटक, हर्षवर्धन, चालुक्य राष्ट्रकूट, पल्लव, पांड्या व गुर्जर, प्रतीहार घराण्यांची भरपूर नाणी उत्खननातून मिळालेली आहेत. वैदिक कालीन नाणी सापडली नाहीत परंतु नाण्यांचे उल्लेख आहेत. सिंधु

63

संस्कृतीतील हजारो शिक्के उत्खननात मिळालेले आहेत. सिक्क्यांप्रमाणेच मेसोपोटेमिया, इराणी, इंडो-ग्रीक, शक, कुशाण राज्यकर्त्यांनी शेकडो नाणी सापडली आहेत. भारतीय सम्राट, मांडलिक सर्व राज्ये, गणराज्य व व्यापारी श्रेणींच्या मुद्रा व नाणी उपलब्ध झालेली आहेत. ही नाणी सोने, चांदी, तांबे व मिश्रधातूंची आहेत. नाण्यांवर व्यक्तींच्या प्रतिमा, पदव्या, चिन्हे, मजकूर आणि चित्रे आहेत. नाण्यांमधून राज्यविस्तार, धार्मिक धोरण, आर्थिकस्थिती व कलेची माहिती मिळते. समुद्रगुप्ताच्या अश्वमेध यज्ञ, वीणावादन, धनुर्धारी, शार्दुलवध व व्याघ्रमुद्रित नाण्यांमधून त्याचा पराक्रम, रसिकता व धार्मिक धोरण स्पष्ट होते.

* नाणी व मुद्रांमुळे पुढील ऐतिहासिक फायदे दिसून येतात.

1) नाण्यांचा विशिष्ट आकार, प्रतिमा, मजकूर मधून धातूकाम व कलेचे दर्शन घडते.

2) नाण्यांमधील पदव्या व लेखी तपशिलातून राज्य विस्ताराची कल्पना येते.

3) धार्मिक बिरुदावली आणि प्रतिमांमुळे राजाच्या धार्मिक धोरणाचे स्वरूप स्पष्ट होते.

4) सोने, चांदी व तांब्याच्या नाण्यांवरून आर्थिक परिस्थितीची जाणीव होते.

5) नाण्यांवरील अनेक प्रतिमांद्वारे राज्यकर्त्यांचा पराक्रम, रसिकता विद्वत्ता व वेशभूषेचा अंदाज बांधता येतो.

10/10 Athavale

DATE 16 10 20

VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR

Student name :- Aarun Babu Rathod.

Class - B.A-I Roll No - 4740

Subject - History

Assignment No - 01

Exam - Internal Examimation

प्रश्न - प्राचीन भारताच्या इतिहासाची अलिखीत / पुरातत्वीय साधने स्पष्ट करा.

उत्तर → कोणत्याही देशाच्या इतिहासलेखनास प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रितीने उपयोगी पडणाऱ्या साधनांना इतिहाससाधने म्हणतात. या साधनांचे वर्गीकरण निरनिराळ्या प्रकारांनी केले जाते; त्यापैकी एक म्हणजेच इतिहासाची आलिखित साधने होय. इतिहासकाळाचे प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक किंवा अर्वाचीन असे तीन विभाग असून त्यात समाविष्ट होणाऱ्या अलिखित साधनांचा विचार करता येतो.

अलिखित साधने किंवा पुरातत्वीय साधने म्हणजे अशी ऐतिहासिक साधने ज्यांच्यामुळे आपल्याला इतिहासाची किंवा तेथील लोकजीवनाची, संस्कृतीची आणि घडलेल्या घटनांची नोंद असते. ती साधने लिखित प्रकारात नसतात, तर अलिखित साधने उदा. पुरातत्वीय वस्तु, भांडी, चित्रे, शिल्प, वास्तु व स्मारके नाणी इत्यादी या साधनांना अलिखित साधने म्हणतात.

ESTD JUNE 1964

45

आलिखीत साधने:- प्राचीन अवशेष व स्मा
नाणी, मुर्ती, लेणी, मंदिरे वस्त्र व भांडी इत्यादी.

1] प्राचीन अवशेष वास्तू व स्मारके -: स्मारके हा एक
अवशेषाचा प्रकार आहे. भारतीयांनी मौर्य काळापासून
स्थापत्य व शिल्पकलेच्या क्षेत्रात नेत्रदिपक प्रगती केले
होती. त्याचा चांगला परिणाम म्हणून चैत्यगृह, स्तूप, वि
लेण्या, मंदिरे, राजवाडे, नगरे, मुर्ती, स्तंभालेख, धातूंच
मातीची भांडी आणि स्मारके अशी विविध स्वरूपात
भारतीय कला भरभराटीस आली. भारतभर आज ती स्म
च्या रूपाने अस्तित्वात आहेत. यातून प्राचीन भारतीयां
ऐतिहासिक कर्तुत्वाचे दर्शन घडते. प्रामुख्याने या सर्व वस
धार्मिक स्वरूपाच्या आहेत. धर्मप्रसाराच्या भुमिकेतून
निर्मिती झाली. धार्मिक व सामाजिक घटनांबरोबरच
त्य, शिल्प, मुर्ती, चित्र आणि धातूकाम शास्त्राच्या उन
ची कल्पना येते.

आधुनिक काळात पुरातत्वशास्त्राला सा
जिक शास्त्राबरोबरच भौतिक शास्त्र म्हणून मानले जा
उत्खननात मिळणाऱ्या विविध वस्तूंचे भुशास्त्र, रसायन
पदार्थविज्ञान, वनस्पतीशास्त्र प्राणीशास्त्र इत्यादी विषय
प्रयोगशाळेतून निरिक्षण केले. उत्खननात मिळणाऱ्या का
वस्तूंचे अवशेष एकूण क्षेत्रफळ यावरून तेथील लोकस
त्यांना लागणारे अन्न आणि उत्पादनाचे क्षेत्र व अवजा
समाजरचना, सामाजिक वर्ग त्यांची आर्थिक स्थिती, द
जीवन इत्यादींची माहिती उत्खननात साधनांच्या आ
मिळते.

स्मारके हि ऐतिहासिक साधने असून एखाद्या
प्राण अर्पण केलेल्या विरांच्या, त्यांच्या शौर्याच्या आठव
एक जीवंत आलिखित पुरावा म्हणजे स्मारके होय.

46


2] नाणी व मुद्रा :- शौर्यकाळापासूनच्या इतिहास समजून घेण्याचे उपयुक्त भौतिक साधन म्हणून नाण्यांचा उल्लेख करता येतो. आधुनिक काळात (Numoasticmatics society of india) तर्फे भारतीय नाण्यांचा सखोल अभ्यास व संशोधन चालू असून तो इतिहासाला पूरक आहे. प्राचीन काळातल्या अनेक राजघराण्याची हजारो नाणी सापडली आहेत. मुद्रा व नाण्यांसारख्याच एक प्रकार आहे. परंतु त्यांचा चलनांप्रमाणे वापर होत नव्हता. राजमुद्रा, व्यापारी मुद्रा, धार्मिक शिक्के, विविध संघटना व संस्थांच्या मुद्रा प्रचलित होत्या. मुद्रांवर प्रतिमा, मजकूर, पदव्या व चिन्हे कोरलेले असते.

मौर्य, गुप्त, सातवाहन, वाकाटक, हर्षवर्धन, चालुक्य, राष्ट्रकुट, पल्लव, पांड्य व गुर्जर, प्रतिहार घराण्यांची भरपूर नाणी उत्खननातून मिळालेली आहेत. वैदिक कालीन नाणी सापडली नाहीत. परंतु नाण्यांचे उल्लेख मात्र आहेत. स्वकीयांप्रमाणेच मेसोपोटेमिया, इराणी, इंडो-ग्रीक, शक, कुशाण राज्यकर्त्यांची शेकडो नाणी सापडली आहेत. भारतीय सम्राट, गणराज्ये व्यापारी मंडळींच्या मुद्रा व नाणी उपलब्ध झालेली आहेत. नाणी किंवा मुद्रा ह्या सोने, चांदी, तांबे व मिश्रधातूंची बनवलेली असायची. नाण्यांमुळे त्याकाळातील आर्थिक देवाणघेवाण समजते. तसेच तेथील राज्यविस्तार व धार्मिक धोरणे लक्षात येतात. नाणी ही वेगवेगळ्या आकारात असायची. काही नाणी गोल तर काही चौकोन व काही अन्य आकारात असायची. हा नाण्यांचा इतिहास महत्त्वांचा होय.

3] मंदिरे व लेणी :- मंदिरे हि देखील इतिहासाची साक्ष देणारी खूणच आहे. मंदिराची रचना वेगवेगळी असते. काही मंदिरे गोलाकार स्वरूपाची असतात, तर काही मंदिरे चौरसाकार असतात. तसेच मंदिरे ही काही एकच दगडात कोरलेली असतात तर काही अनेक दगडांच्या विटांच्या मदतीने उभारलेली असतात.

मंदिरामुळे आपल्याला त्याकाळातील देवदेवतांवरची श्रद्धा, पुजा, महत्त्व समजून येते. तर आपल्याला तेथील, त्या काळातील लोकांच्या धार्मि जीवनाचे महत्त्व समजते. पुर्वीची मंदिरे व आधुनि मंदिरे यात खुप साम्य आढळते.

<u>मंदिराची रचना</u>





अशा प्रकारची मंदिरे प्राचीन काळातही होती, आधुनिक काळात पण आहेत हे कळते. काही मंदिरे व असतात तर काही बांधलेली. तसेच लेणी हि देखील अ खित खुणाच आहे. ज्याच्यामुळे आपण इतिहासाचा अ करु शकतो. लेणी हि फक्त कोरीव स्वरुपाची असता तर काही लेणी गुहेत देखील कोरलेली असतात. प्रा काळाच्या इतिहासातील जीवनशैलीचा बोध हो काही राज्यांच्या मुर्ती कोरलेल्या असतात. याचा खू फायदा होतो.

4] <u>मुर्ती, वस्तु/भांडी</u> :- मुर्ती हि एक अलिखित ऐतिहासि साधन आहे. याचा वापर खूप होतो जेव्हा आपण इतिहास शिकत असतो. मुर्त्या ह्या देवदेव व राजा, राणी किंवा एखाद्या प्रसंगाच्या असतात. मु मुळे त्यावेळेचे धार्मिक व राजाचे रुप वगैरे आणि गो माहिती मिळते. मुर्ती ह्या दगडावर किंवा एखाद्या धातुंवर बनवल्या असायच्या.

(48)

वस्तू किंवा भांडी हि देखील अलिखित साधने असून आपल्याला इतिहासाच्या अभ्यासात महत्त्वपूर्ण असतात. भांड्यामुळे त्यावेळच्या लोकांच्या राहणीमानीचा अंदाज येतो. भांडी हि पूर्वी मातीपासून बनवायची आता आपण मातीची व धातूपासून बनवलेली वापरतो. पूर्वी सर्वांत जास्त प्राचीन काळी मातीपासून लाल व काळ्या रंगाचे मोठे मडके, हंडा बनवायचे उदा:-

मातीची भांडी –



या भांड्यावरून आपल्याला त्या काळच्या कलेचे दर्शन घडते जाणीव होते. प्राचीन लोक खूप हुशार होते. त्यांनी बनवलेल्या वस्तू तरांच्या आपण आपल्या दैनंदिन जीवनात वापर असतो.

अशी खूप वैशिष्ट्ये आपल्याला दिसून येतात.

अलिखित वस्तूंमुळे आपण प्राचीन मध्ययुगीन व आधुनिक इतिहासाचा अविस्मरणीय पुरेपुर अभ्यास करू शकतो. आपण आपल्या दैनंदिन जीवनातही पुर्वीप्रमाणे तराच किंवा त्यात थोडीफार आधुनिकता आणून अलिखित साधने बनवतो किंवा वापरतो.

याचेच उत्तम उदाहरण म्हणजे मंदिरे, स्मारके, नाणी, वस्तू, भांडी; असा अनेक प्रकारच्या अलिखित साधने आपण दैनंदिन जीवनात वापरतो.

इतिहासाच्या प्रत्यक्षपणे अभ्यास करणे म्हणजेच इतिहासातील अलिखित साधनांचा अभ्यास होय. अलिखित साधने हि इतिहासातील महत्त्वाचे साधने आहेत. इतिहासातील साधनांचे प्रामुख्याने दोन भाग पडतात. 1] लिखीत साधने 2] अलिखीत साधने.

अलिखित साधनांमुळे इतिहासातील लोकांच्या राजे- राजवाड्याच्या जीवनाचा आढावा आपल्याला

मिळतो. आपल्याला इतिहास हा सोप्या पद्धतीने समजतो
उदा- जसे किल्ले गड पाहून आपण छत्रपती शिवाजी
महाराज किंवा संभाजी महाराज यांचा इतिहास
समजून घेऊ शकतो. व तो अलिखित साधनांमुळे स्मरणा-
तही राहू शकतो.
भारताच्या प्राचीन इतिहासात अलिखित
साधनांचा खूप मोठा वाटा आहे.

(50)

7/10

DATE 16/10/20

Shri Swami Vivekanand Shikshan Santha, Kolhapur

VEVEKANANd COLLAGE, Kolhapur

Assignment No: 1

Name :- Pradip Dattatray Gurav
Calss : B.A I  Roll No- ~~4488~~ 4788
Sub :- Histroy  Exam - Internal exam
Moh No- 9579633544

Q1 प्राचीन भारताच्या इतिहासाची अलिखित / पुरातत्वीय साधणे स्पष्ट करा.

भारताच्या अभ्यासासाठी लिखित अलिखित अशी दोन प्रकारची साधने आहेत. लिखित साधनामध्ये परकीय प्रवासवर्णन तसेच भारतीय भाषेतील साधन यांचा समावेश होतो. भारताच्या इतिहासासाठी अलिखीत साधणे खूप महत्त्वाची असतात. कारण त्या साधनामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल होत नाही. या साधनांच्या आधारे आपल्याला प्राचीन भारताची राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक परिस्थितीची माहिती मिळते.

प्राचीन भारतीय इतिहासाची अलिखीत साधने पुढीलप्रमाणे :- अलिखित साधनाना भौतिक साधने किंवा पुरातत्वीय साधने असेही म्हटले जाते. भौतिक साधने ही खूप महत्त्वाची असतात. कारण त्या मध्ये कोणत्याही प्रकारचा बदल पुन्हा करता येत नाही.

1. अवशेष :- लॉर्ड कर्सनने 1904 मध्ये स्वतंत्र उत्खनन सुरू केले. त्याचा प्रमुख म्हणून मार्शल यांना नेमण्यात आले. डॉ. स्पुनरने यांनी पाटलीपुत्र येथील ठिकाण उत्खनन केले. हे उत्खनन करताना प्राचीन भारतामधील इमारती, बांधकाम रस्ते, सांडपाण्याची व्यवस्था, बाजारपेठ, घरबांधणीची रचना इ. बाबत मिळाली. अश्मयुगीन मानवापासून ते गुप्त सातवाहना पर्यंतची माहिती उत्खननातून मिळाली. तसेच त्यांचा जीवनशैली बदल माहिती देणाऱ्या अनेक गोष्टी सापडल्या. यामध्ये भांडी, कपडे, मूर्ती, खेळणी, टोपली, शेतीची अवजारे धान्य इ.ची माहिती प्राप्त झाली. हाडाच्या सांगाड्यावरून प्राणी व मानवाच्या वंश यांची माहिती मिळाली.

2. स्मारके :- स्मारके म्हणजे भूतकालीन बांधकाचे अवशेष होय. स्मारकांना राजकीय दृष्टिकोनापेक्षा सांस्कृतिक दृष्टिकोनातून

COLLEGE ESTD 1964 (Autonomous)

(51)

जास्त महत्व दिले जाते. प्राचीन भारतामध्ये गड किल्ले, गुफा लेणी, स्तंभ, घरे, राजवाडे इ. स्वरूपात स्मारके आढळतात. पाटली पुत्र उत्खननातुन मौर्य राजधानीची तक्षशीला येथुन विद्यापीठाची, काश्मीर मधील उत्खननातून बौद्ध मठ आणि भिंतीवरती नृत्तीची माहिती मिळते स्मारकाच्या आधारे तत्कालीन बांधकामातुन घरे बांधण्याची पद्धत, लोकजीवन, धर्म, शस्त्रे अवजारे, शिक्षणसंस्था इ. माहिती मिळते वारानसी, श्रीवस्ती, मथुरा येथील उत्खननावरून राजकीय तसेच सांस्कृतिक विकासाची माहिती मिळते. श्रीलंकेत अनुराधापुर पोलोनरूणा येथे बौद्ध धर्माविषयी माहिती मिळते. प्राचीन स्थापत्य कलेची समृद्धता त्यातून दिसून येते.

3. आलेख: आलेख हा पाषाण किंवा ताम्रपट्यावर कोरलेला असतो. प्राचीन भारताच्या इतिहासामध्ये आलेख हा महत्वाचा भाग आहे. बोझागकोई हा मध्य आशियातील इ.स 1500 च्या दरम्यानचा भारतातील सर्वात प्राचीन शिलालेख आहे. या मध्ये ऋग्वेद कालीन मित्र वरूण आर्यसदृश देवतांचा समावेश आहे. सम्राट अशोक च्या काळात आलेख कोरण्याची पद्धत अधिक विकसित झाली.

या आलेखामध्ये शिलालेख, गुहालेख, मुर्तीलेख पत्रलेख, ताम्रपट, मंदिर लेखाकाचा समावेश केला जातो. या आलेखाच्या माध्यमातून उत्सव, दानधर्म, किर्ती, धार्मिक साहित्यीक इ. समावेश होतो.

I] शिलालेख :- पर्वतीय प्रदेशात मोठ्या खडकावर कोरलेल्या आलेखाना शिलालेख म्हणतात. अशोकाच्या चौदा आलेखाचा सर्वप्रथम उल्लेख शिलालेख म्हणून करण्यात आला. हे सोपारा येथे, येरंगुडी इ. ठिकाणी आहेत. "प्रियदसि" नावेने कोरलेले आलेख अशोकाचे आहे. या माहिती ही मास्की आलेखावरून समजते. कारण "प्रियदसि" नावाबरोबर "असोकस" शब्दाचा उल्लेख केला जातो. नाशिक जवळ सापडलेल्या शिलालेखापासून शातवाहन व शक क्षत्रप यांच्या संघर्षाची माहिती मिळते. कंधार शिलालेखातून राष्ट्रीय कुळांची माहिती मिळते. कल्याणीच्या चालुक्याचे शिलालेख नांदेड व उस्मानाबाद जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात सापडले आहेत.

II] मंदिर लेख -: मंदिर हा शब्द बहुतांश हिंदू व जैन धर्माच्या प्रार्थनास्थळासाठी वापरला जातो. भारतामध्ये मंदिर व बौद्धधर्माचे स्तुप निर्माण करण्याची परंपरा सुरू झाली. तेव्हापासून काही धार्मिक तत्वे सुरक्षित ठेवण्यासाठी मंदिराच्या भिंतीवर दरवाज्यावर कोरली गेली.

III] स्तंभलेख :- पुष्कळ्या ठिकाणी स्तंभ उभा करून त्यावर कोरलेल्या आलेखाला स्तंभलेख म्हणतात. स्तंभ उभारण्याची

ESTD (Autonomous)

पद्धत सिंधु संस्कृती पासुनची आहे परंतु स्तंभावर आलेख कोरण्याची परंपरा सम्राट अशोक पासून चालू झाली. अशोकाचे स्तंभालेख नंदनगढ, दिल्ली, ईलाहबाद येथे प्राप्त आहेत. यांची सरनाथ स्तंभलेखातून बौद्धधर्मातील मतभेद करण्यासाठी अशोकाने केलेल्या प्रयत्नांची माहिती मिळते. अशोकांचे वायव्य प्रांतातील स्तंभलेख हे केलेल्या प्रयत्नांची माहिती मिळते अशोकांचा वायव्य प्रांतातील स्तंभलेख हे खारोटी लिपीतून असून बाकी सर्व ब्राम्ही लिपीतून आहे

IV ) ताम्रपट -

प्राचीन काळात राजातर्फे एखाद्या व्यक्तीला दान देताना ते तांब्याच्या पट्यावर कोरून दिले जाते त्यास ताम्रपट म्हणतात ताम्रपटावर प्रथम कुलदेवतेची प्रार्थना वंशावळ व घराण्याचा इतिहास कोरला जातो. त्यानंतर तुझ्या-साठी व काय दान दिले याची माहिती असते. ताम्रपटावर सर्वसाधारणपणे शक्याने जमिनीची दान केल्याची माहिती असते. राजाकडून देणगीच्या रूपाने ताम्रपटाच्या स्वरूपात मिळालेल्या जमिनीच्या मालकीचा हा हस्तऐवज लोक सांभाळून ठेवतात. राजाकडून मिळालेल्या अश्या प्रकारचे दान त्या व्यक्तीसंबंधीसाठी सामाजिक प्रतिष्ठेची बाब असते.

4] कला :- मौर्य, सातवाहण, गुप्त राष्ट्रकुट, वाकाटक या राजघराणाच्या कालखंडात निर्माण झालेल्या कला इतिहासाचे बोलके पुरावे आहेत. ज्ञात झालेल्या विविध प्रकारच्या वस्तु, मुर्ती शिल्प, चित्र इ. आधारे तात्कालीन कलेची माहिती मिळते. दगड, लाकूड, धातू, माती या स्वरूपात उत्खनन अवशेष प्राप्त झाले आहे. गुप्तकला, मथुरा कला इ. महत्त्वाच्या मुर्तीकला होत्या. मूर्तीवरून तसेच चित्रकलेवरून वेषभुषा, केशभुषा, अलंकार तसेच देवतांच्या मूर्तीवरून धार्मिक परिस्थितीची माहिती मिळते. उदा. अजंठा-वेरूळ चित्रकला विविध वस्तुमधुन तत्कालीन लोकांचे छंद मनोरंजन इ. माहिती मिळते. माती व दगडापासून तयार झालेल्या मुद्रा तयार केलेले शिक्के, त्यावरील प्राणी, चित्रे, लिपी यांची माहिती मिळते.

5] नाणी / मुद्रा :

प्राचीन भारतात राजे, व्यापारी संघटना सोने, चांदी, तांबे, शिसे इ. धातुची नाणी तयार केली. प्रचलित नाणे साधी व ओबडधोबड एका बाजूस चित्राचे ठसे असतात. आलेक्झांडरच्या स्वारीनंतर नाण्याच्या मध्ये बदल करण्यात आला. नाण्यावर राज्याचे नाव, सन तसेच अन्य मजकुर उमटविण्याची पद्धत चालू झाली.

तसेच नाण्याचे आकारमान व वजन निश्चित करण्यात आले
मौर्य, गुप्त, सातवाहन चोणक्य, राष्ट्रकूट
प्रतिघर हरण्याची भरपुर नाणी उत्खननातून मिळाली.
सिंधु संस्कृतितील हजारो शिक्के उत्खननातून सापडले आ-
हेत. नाणी ही सोने, चांदी किंवा मिश्र धातुंनी बनवलेली
असायची. नाण्यामुळे त्या काळातील आर्थिक व्यवस्था, देवाण-
घेवाण समजते. त्या काळात नाणी ही गोल आकाराची तसेच
चौकोनी आकाराची असायची. प्राचीन काळातील नाण्यामुळे
आपल्याला वेशभूषेचा अंदाज बांधता येतो. नाण्यावरील
अनेक प्रतिमाद्वारे राज्यकर्त्यांचा पराक्रमाची माहिती मिळते.



1870 1946 1996 SINGAPURA

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

1/10

दि 16-10-20

विवेकानंद कॉलेज कोल्हापूर

कु. गायत्री सुनिल कांबळे. (Roll No. 4607)

प्रश्न .1) प्राचीन भारताच्या इतिहासाची अलिखित (पुरातत्वीय) साधने स्पष्ट करा.

पुरातत्वीय साधने -

या साधनांमध्ये शिलालेख, ताम्रपट, नाणी, मूर्ती गुहालेख, लेणी, मंदिर प्राचीन स्मारके व त्यांचे अवशेष आणि उत्खननात मिळालेल्या अवशेषांचा समावेश होतो

1) प्राचीन अवशेष व स्मारके -

भूतकालीन इतिहास आपल्या कर्तृत्वाचे जे पुरावे मागे ठेवतो त्यास प्राचीन अवशेष असे म्हणतात. भारतात स्थापत्य, शिल्प, चित्र व धातुकाम कलेमध्ये आश्चर्यकारक प्रगती झालेली होती त्याचे अवशेष भारतभर विखुरलेले आहेत. जमिनीवर व जमिनीत गाडप झालेल्या हजारो वस्तू साक्षात इतिहास स्वरूप कायम आहेत. यावरून प्राचीन अवशेषांचे स्थूलमानाने दोन प्रकार पडतात ज्या पुरातत्वीय वस्तू व वस्तू जमिनीवर असून सहजपणे उपलब्ध होतात त्यांना प्राचीन स्मारके असे म्हणतात व आणि जमिनीत गाडप झालेल्या वस्तू उत्खनन करून मिळवाव्या लागतात त्यांना प्राचीन अवशेष असे म्हणतात. प्राचीन अवशेष आणि स्मारकांचे संरक्षण व संशोधन करण्यासाठी पुरावस्तू संशोधन खात्याची स्थापना करण्यात आली. आतापर्यंत झालेल्या उत्खननामध्ये नगरे खेडी, राजवाडे, मंदिर, चैत्यगृह, विहार व विद्यापीठाच्या अनेक वास्तू उत्खननातून उपलब्ध झाल्या. त्याचप्रमाणे नाणी, मुद्रा, मूर्ती, अस्थि विटा खापरे, धार्मिक वजने मापे, शस्त्रे, औषधी शृंगार, पेट्या, ताम्रपट, शिक्के खेळणी, मातीची भांडी, धातूच्या वस्तू, कापड धान्यादि अवशेषांमुळे

आढळ प्राचीन काळातल्या सामाजिक, आर्थिक धार्मिक व सांस्कृतिक इतिहासाची माहिती मिळते.

२) स्मारके :-

स्मारके हा प्राचीन अवशेषाचा एक प्रकार आहे. भारतीयांनी मौर्य काळापासून स्थापत्य व शिल्पकलेच्या क्षेत्रात नेत्रदीपक प्रगती केलेली आली होती, त्यांच्या चांगला परिणाम म्हणून चैत्यगृह, स्तूप, विहार, लेण्या, मंदिरे, राजवाडे, नगरे, मूर्ती, स्तंभालेख, मातीची व धातूची कलात्मक भांडी अशा विविध स्वरूपात भारतीत कला बहरराटी आली ; या स्मारकांमधून तत्कालीन धार्मिक स्वरूप आहेत; धर्मप्रसाराच्या भूमिकेतून त्यांची निर्मिती झाली या स्मारकामधून तत्कालीन धार्मिक सामाजिक जीवनाबरोबर स्थापत्य शिल्प मूर्ती चित्रकला आणि धातुकाम शास्त्राच्या प्रगतीची कल्पना येते. उत्खननात मिळणाऱ्या विविध वस्तूंचे पुरावे रसायनशास्त्र भौतिक शास्त्र म्हणून मानले जाते

३) आलेख :-

एका अर्थाने हे आलेख म्हणजे लिखित भौतिक पुरावे आहे संस्कृत, पाली, मागधी, मोडी, कन्नड, तेलुगू व इतर प्राकृत भाषेत हे आलेख लिहिले गेले, त्याचप्रमाणे ब्राह्मी, देवनागरी, तमिळ कन्नड व खरोष्ठी ही त्यांची लिपी आहे भारतीयांनी या लेखांमधून इतिहासाचे ज्ञान मिळते इतर लेखन सामग्रीची कमतरता असल्यामुळे आणि मजकूर दीर्घकाळ टिकावा म्हणून प्राचीन भारतीयांनी या लेखांमधून इतिहास निर्मितीची धडपड केली या माध्यमांमुळे स्तंभालेख, गृहालेख धातूलेख, प्रस्तरलेख (शिलालेख) असे प्रकार निर्माण झाले ही धनपत्र करण्यासाठी व राजाला जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी

काही आलेख कोरविण्यात आले, युद्धातील विजय अभिनंदन व्यापारी संस्था व विविध प्रसंगाच्या स्मृतिप्रित्यर्थ लेखांची निर्मिती करण्यात आली. प्राचीन काळातील राज्यविस्तार शासन प्रणाली युद्धपद्धती लष्कर व्यवस्था, शासन अधिकारी, समाजजीवन देवता धर्मकल्पना, अर्थस्थिती, व्यापार धंदे व करव्यवस्था इत्यादी अनेक विषयांची माहिती लेखांमधून मिळते, कालखंड भाषा, लिपी व संस्कृतीचे ज्ञान त्यातून होते

४) शिलालेख :-

शिलालेख प्राचीन भारताच्या अभ्यासाची महत्वाची साधने आहेत इतिहासाच्या अभ्यासाचे एक साधन म्हणून शिलालेखांकडे पाहिले जाते मोठ्या मोठ्या दगडी शिलांवर खडकांवर आणि दगडी स्तंभावर लेखन करण्याची पद्धती मौर्य सम्राट अशोकाच्या काळापासून सुरू झाली. अशोकाच्या शिलालेखात प्रामुख्याने राजाज्ञा व आदेश तसेच बौद्ध धर्माचे संदेश आढळतात, यानंतर या शिलालेखात राजांनी गुणवर्णन, वंशावळी सरदारांची व अधिकाऱ्यांची नामावली. तसेच क्वचित प्रसंगी दानपत्र सुद्धा कोरलेले आढळतात

1) इ.स.पू. 1400 च्या आशिया मायनरमधील बोगाजकोई शिलालेख आर्यांच्या मूळ स्थानावर प्रकाश टाकतो

2) ओडिसातील कलिंग राजा खारवेल च्या हाथीगुंफा शिलालेख शुंग व खारवेल घराण्याची माहिती पुरवितो

3) शिलालेखामधून चालुक्य सम्राट पुलकेशी व हर्षवर्धन यांची माहिती उपलब्ध होते

COLLEGE ESTD 1984

4) अशोकाच्या 14 शिलालेख (प्रस्तलेख), 7 स्तंभलेख, येन कलिंगलेख व इतर लेखांमधून मौर्य घराण्याचा इतिहास समजतो.

5) ताम्रपट :-

हा अभिलेखाचाच एक प्रकार आहे तांब्याच्या पत्र्यावर कोरलेल्या सनदांना ताम्रपट असे म्हणतात. दिलेल्या दानाची माहिती तांब्याच्या पत्र्यावर कोरून प्रशस्तीरूपाने (सनद) देण्याची पद्धती होती. अशा दानपत्रांमध्ये तपशील जमिनीचा आकार, घेणाऱ्याचे नाव इत्यादीची सविस्तर नोंद करीत असे. हे ताम्रपट संस्कृत व प्राकृत भाषेत आहेत. कालगणना, राजकीय इतिहास, धार्मिक धोरणांची माहिती यावरून मिळते. विदर्भाच्या वाशिम ताम्रपट, प्रभावती गुप्ताचे पुणे ताम्रपट, बहुसंख्य प्रकरणे शिवनी ताम्रपटाचे कुमारगुप्ताचा दामोदर ताम्रपट आणि सातवाहन राजवट यांच्या काळच्या शेकडो ताम्रपटांमधून वाकाटक राजघराण्याचा इतिहास मिळतो.

58

VIVEKANAND COLLEGE ESTD. JUNE 1964 (Autonomous)

6) नाणी व मुद्रा

प्राचीन काळातल्या अनेक राजघराण्यांची हजारो नाणी सापडलेली आहेत मुद्रा हा नाण्यांसारखाच एक प्रकार आहे, परंतु त्याचा चलनाप्रमाणे वापर होत प्रतिमा मजकूर पदव्या व बोधचिन्ह कोरलेले असे त्या विविध धातूच्या होत्या मौर्य गुप्त सातवाहन वर्धन, चालुक्य राष्ट्रकूट पल्लव, पांड्या व गुर्जर, प्रतिहार घराण्याची भरपूर नाणी उत्खननातून मिळालेली सिंधू संस्कृतीतील हजारो शिक्के उत्खननात मिळालेले आहेत स्वाक्षऱ्यांप्रमाणेच मेसोपोटेमिया इराणी इंडो-ग्रीक शक कुषाण राज्यकर्त्यांची शेकडो भारतीय सम्राट, मांडलिक राज्ये गणराज्ये व व्यापारी श्रेणींच्या मुद्रा व नाणी उपलब्ध झालेली आहेत. नाण्यांवर व्यक्तीच्या प्रतिमा पदव्या, चिन्हे मजकूर आणि चित्रे आहेत. नाण्यांमधून राज्यविस्तार धार्मिक धोरण आर्थिक स्थिती व कलेची माहिती मिळते

नाणी व मुद्रांमुळे पुढील ऐतिहासिक फायदे दिसून येतात

1) नाण्याच्या विशिष्ट आकार, मजकूर मधून धातुकाम व कलेचे दर्शन घडते.

2) नाण्यांमधील पदव्या व लेखी तपशीलातून राज्याच्या विस्ताराची कल्पना येते.

3) सोने, चांदी व तांब्याच्या नाण्यांवरून आर्थिक परिस्थितीची जाणीव होते.

VIVEKANAND COLLEGE ESTD JUNE 1964 (Autonomous)

10/10 [signature]

classmate
Date 16-10-20
Page

विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर [स्वायत्त]

- नाव :- कु. साईराज दिलीप माळी
- वर्ग :- B.A. (I) • रजिस्टर क्रं :- 4665
- विषय :- इतिहास
- गृहपाठ क्रं :- 01
- परिक्षा :- अंतर्गत अंतर्गत मुल्यमापन परिक्षा 2021

प्र.

प्र. 1) प्राचीन भारताच्या इतिहासाची अलिखीत / पुरातत्वीय साधने स्पष्ट करा ?

उत्तर ⟹ कोणत्याही देशाच्या इतिहासलेखनास प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रितीने उपयोगी पडणाऱ्या साधनांना इतिहाससाधने म्हणतात. या साधनांचे वर्गिकरण निरनिराळ्या प्रकारांनी केले जाते; त्यापैकी एक म्हणजेच इतिहासाची अलिखीत साधने होय. इतिहासकाळाचे प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक किंवा अर्वाचीन असे तीन विभाग असुन त्यात समाविष्ठ होणाऱ्या अलिखीत साधनांचा विचार करता येतो.

अलिखीत साधने किंवा पुरातत्वीय साधने लिखीत प्रकारात नसतात, म्हणजे अशी ऐतिहासिक साधने ज्याच्यामुळे आपल्याला इतिहासाची किंवा तेथील लोकजीवनाची संस्कृतिची आणि घडलेल्या घटनांची नोंद असणे अलिखीत साधने ही

College Kolhapur JUNE 1964 (Autonomous)

लिखीत स्वरूपाची नसते, तर अलिखीत साधने ही उदाहरणार्थ, पुरातत्वीय वस्तू, भांडी, आयुधे, चित्रे, शिल्प, वास्तू, नाणी, लेणी व स्मारके इत्यादी. या प्रकारच्या साधनांना आपण अलिखीत साधने असे म्हणतो.

★ **अलिखीत साधने** :- प्राचीन अवशेष व स्मारके, ii) नाणी iii) मुर्ती iv) लेणी v) मंदिरे vi) वास्तू व भांडी इत्यादी.

i) प्राचीन अवशेष वस्तू व स्मारके :- स्मारके हा एक प्राचीन अवशेषाचा प्रकार आहे. भारतीयांनी मौर्य काळापासुन स्थापत्य व शिल्पकलेच्या क्षेत्रात नेत्रदिपक प्रगती केलेली होती. त्याचा चांगला परिणाम म्हणुन चैत्यगृह, स्तुप, विहार, लेण्या, मंदिरे, राजवाडे, नगरे, मुर्ती, स्तंभालेख, धातूची व मातीची भांडी आणि स्मारके अशी विविध स्वरूपात भारतीय कला भरभराटीस आली. भारतभर आज ती स्मारकांच्या स्वरूपाने अस्तित्वात आहेत. यातुन प्राचीन भारतीयांच्या ऐतिहासिक कर्तुत्वाचे दर्शन घडते प्रामुख्याने या सर्व वस्तू धार्मिक स्वरूपाच्या आहेत. धर्मप्रसाराच्या भुमिकेतुन त्यांची निर्मीती झाली. या स्मारकांमधून तत्कालीन धार्मिक व सामाजिक घटनांबरोबरच स्थापत्य, शिल्प, मुर्ती, चित्र आणि धातूकाम शास्त्राच्या उन्नतीची कल्पना येते.

आधुनिक काळात पुरातत्वशास्त्राला सामाजिक शास्त्राबरोबरच भौतिकशास्त्र म्हणुन मानले जाते. उत्खननात मिळणाऱ्या विविध वस्तूंचे भूशास्त्र व रसायनशास्त्र, पदार्थविज्ञान, वनस्पतीशास्त्र

(6)

प्राणिशास्त्र इत्यादी विषयांच्या प्रयोगशाळांमधून परि-
-क्षण करणे शक्य झालेले आहे. उत्खननात मिळणा-
-या वस्तू व वास्तूंचे अवशेष एकूण क्षेत्रफळ यावरू-
-न तेथील लोकसंख्या, त्यांना लागणारे अन्न आणि
उत्पादनाचे क्षेत्र व अवजारे समाजरचना. सामाजिक
वर्ग, त्यांची आर्थिक स्थिती, धार्मिक जीवन इत्या-
-दींची माहिती उत्खनित साधनांच्या आधारे मिळते

स्मारके ही ऐतिहासिक साधने असून,
एखाद्या चळवळीत प्राण अर्पण केलेल्या वीरांच्या,
त्यांच्या शौर्याच्या आठवणींचा एक जिवंत अलिखीत
पुरावा म्हणजेच स्मारके होय.


स्मारक :- आकृती




III) **नाणी व मुद्रा :-** मौर्यकाळापासूनचा इतिहास समजून
घेण्याचे उपयुक्त भौतिक साधन म्हणून नाण्यांचा
उल्लेख करता येतो. आधुनिक काळात (Numismatics Society of India) तर्फे भारतीय नाण्यांचा सखोल अभ्यास व संशोधन चालू असून
तो इतिहासाला पूरक आहे. प्राचीन काळातल्या
अनेक राजघराण्यांची हजारो नाणी सापडली आहेत.
मुद्रा हा नाण्यांसारखाच एक प्रकार आहे. परंतु त्याचा
चलनाप्रमाणे वापर होत नव्हता. राजमुद्रा, व्यापारी-
-मुद्रा, धार्मिक मुद्रा/शिक्के विविध संघटना व

संस्थांच्या मुद्रा प्रचलित होत्या. मुद्रांवर प्रतिमा मजकूर, पदव्या व बोधचिन्ह कोरलेले असत. त्या विविध धातूंच्या असायच्या.

मौर्य, गुप्त, सातवाहन, वाकाटक, हर्ष-वर्धन, चालुक्य, राष्ट्रकूट, पल्लव, पांड्य व गुर्जर, प्रतिहार घराण्यांची भरपूर नाणी उत्खननातून मिळालेली आहेत. वैदिक कालीन नाणी सापडली नाहीत, परंतु नाण्यांचे उल्लेख मात्र आहेत.





नाणी      मुद्रा

सिंधु स्व संस्कृतीतील हजारो शिक्के उत्खननातून मिळालेली आहेत. वैदीक कालीन नाणी सापडली नाहीत, परंतु नाण्यांचे उल्लेख मात्र आहेत. सिंधु संस्कृतीतील हजारो शिक्के उत्खननात मिळालेले आहेत. स्वकीयांप्रमाणेच मेसोपोटेमिया, इराणी, इंडो-ग्रीक, शक, कुशाण राज्यकर्त्यांची शेकडो नाणी सापडली आहेत. भारतीय सम्राट, मांडलिक राज्ये, गणराज्ये व व्यापारी श्रेणींच्या मुद्रा व शिक्के व नाणी उपलब्ध झालेली आहेत. नाणी किंवा मुद्रा ह्या सोने, चांदी, तांबे व मिश्रधातूंची बनवलेली असायची. नाण्यांमुळे त्याकाळातील आर्थिक देवाणघेवाण समजते तसेच तेथील राज्यविस्तार व धार्मिक धोरणे लक्षात येतात. नाण्यांवरती काही राज्यांच्या प्रतिमा, पराक्रम त्यांची विशेषता कोरलेली असायची. नाणी गोल तर काही चौकोन व काही अ-

-न्य आकाराची पण असायची. हा नाण्यांचा इति-
-हास व महत्त्व होय.

III] मंदिरे व लेणी :- मंदिरे ही देखील इतिहासाची साक्ष देणारी स्रोत आहे. मंदिरांची रचना वेगवेगळी अ-
-सते काही मंदिरे गोलाकार स्वरूपाची असतात तर काही मंदिरे चौरसाकार असतात. तसेच मंदि-
-रे ही काही एकाच दगडात कोरलेली असतात. तर काही अनेक दगडांच्या किंवा विटांच्या मदतीने उभारलेली असतात.

मंदिरांमुळे आपल्याला त्या काळातील देवदेवतांची श्रद्धा, पुजा, महत्त्व समजुन येते. तसेच आपल्याला तेथील, त्या काळातील लोकांच्या धार्मिक जीवनाचे महत्त्व समजते. पुर्वीचे मंदिर व आधुनिक मंदीर यांत खुप साम्य आढळते, त्यांची रचना सारखीच दिसते. उदाहरणार्थ,





"अशा प्रकारची मंदिरे प्राचीन काळातही होती आणि आधुनिक काळात पण आहेत हे समजते काही मंदिरे कोरीव असतात तर काही बांधलेली.
तसेच लेणी ही देखील कोरलेली असतात ती अलि-
-खीत साधनच आहे. लेणी ही धातुंवर किंवा दगडावर कोरलेली असतात. लेण्यांमुळे आपल्याला प्राचीन काळाच्या इतिहासातील जीवनशैलीचा बोध होतो.

काही राज्यांच्या मुर्ती कोरलेल्या असतात, यांचा खुप फायदा होतो.

IV) मुर्ती, वस्तु, भांडी – मुर्ती ही एक अभिलेखीत ऐतिहासिक साधन आहे. याचा वापर खुप होतो, जेव्हा आपण इतिहास शिकत असतो. मुर्त्या ह्या देव-देवतांच्या व राजा, राणी किंवा एखाद्या व्यक्तिच्या किंवा प्रसंगाच्या असतात. मुर्तिंमुळे त्यावेळचे धार्मिक जिवन व राजांचे रुप वगैरे आदि गोष्टींची माहिती मिळते. मुर्ती ह्या दगडावर किंवा एखाद्या धातुवर बनवलेल्या असायच्या, आजच्या तशाच आहेत.

वस्तु किंवा भांडी ही देखील अभिलेखीत साधने असुन आपल्याला इतिहासाच्या अभ्यासात महत्वपुर्ण असतात. भांड्यांमुळे त्या वेळच्या लोकांच्या राहणीमानाचा अंदाज येतो. भांडी ही पुर्वी मातीपासुनच बनवायचे आता आपण मातीची व धातुंपासून बनवलेली वापरतो. पुर्वी सर्वात आधी, प्राचीन काळी मातीपासून लाल व काळ्या रंगांचे मोठे मडके, हंडा बनवायचे. उदाहरणार्थ,



मातीची भांडी

classmate
Date ______
Page ______

या भांड्यांवरून आपल्याला त्या काळच्या लोकांचे वस्त्रांचे दर्शन घडते, जाणीव होते. प्राचीन लोक खुप हुशार होते त्यांनी बनवलेल्या वस्तु तशाच प्रकारच्या वस्तु आपण आपल्या दैनंदिन जीवनात वापरत असतो. अशी खुप वैशिष्ट्ये आपल्याला दिसून येतात.

अलिखीत वस्तुंमुळे आपण प्राचीन, मध्य-युगीन व आधुनिक इतिहासाचा अविस्मरणीय, पुरेपुर अभ्यास करू शकतो. आपण आपल्या दैनं-दिन जीवनातही पुर्वीप्रमाणे तशाच किंवा त्यात थोडीफार आधुनिकता आणुन अलिखीत साधने बनवतो व वापरतो.

याचेच उत्तम उदाहरण म्हणजे मंदिरे, स्मार-के, नाणी, वस्तु, भांडी; अशा अनेक प्रकारच्या अ-लिखीत साधने आपण दैनंदीन जीवनात वापरत असतो तसेच त्या बनवत देखील असतो.

इतिहासाचा प्रत्यक्षपणे अभ्यास करणे म्ह-णजेच इतिहासाच्या अलिखीत साधनांचा अभ्यास होय. अलिखीत साधने ही इतिहासाच्या अभ्यासात खुप महत्वाचे साधन आहे. इतिहासाच्या साधनांचे प्रामुख्याने दोन प्रकार पडतात; I) लिखीत साधने व II) अलिखीत साधने.

अलिखीत साधनांमुळे इतिहासातील लो-कांच्या, राजे-रजवाड्यांच्या जीवनाचा आढावा आपल्याला मिळतो. आपण अंदाज लावून ऐतिहा-सिक घटना, जीवनशैली चांगल्याप्रकारे समजून घेऊ शकतो. म्हणून इतिहासातील जेवढे लिखीत साधनांना महत्व आहे तेवढेच किंबहुना त्या-पेक्षा जास्त अलिखीत साधनांना आहे. अ-

JUNE 1964

लिखीत साधनांचा अभ्यास केल्यामुळे आपल्याला इतिहास हा सोप्या पद्धतीने समजतो. उदाहरणार्थ जसे की, किल्ले / गड पाहून आपण छत्रपती श्री शिवाजी महाराज किंवा छत्रपती संभाजी महाराज यांचा इतिहास समजुन घेऊ शकतो व तो अलिखीत साधनांमुळे स्मरणात ही राहू शकतो.

भारताच्या प्राचीन इतिहासात अलिखीत साधनांचा खूप मोठा वाटा आहे. त्याची व्याप्ती देखील मोठी आहे आणि भारतीय इतिहासाची अलिखीत साधने ही जगप्रसिद्ध आहेत. उदाहरणार्थ, आग्र्याचा "ताजमहल".

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD JUNE 1964
(Autonomous)